# बातमीचा नमुना
## मानसेवी होमगार्ड सदस्य नोंदणी

धुळे जिल्हयातील सर्व पथक/उप पथकामधील ५८५ (पुरुष ४१० व महिला १७५) पुरुष व महिला होमगार्डची सदस्य नोंदणी दिनांक १२/८/२०१७ रोजी पोलीस कवायत मैदान,पोलीस मुख्यालय, धुळे येथे सकाळी ०५.०० वाजल्यापसून ते सकाळी ०९.३० वाजेपावेतो घेण्यात येणार आहे. होमगार्ड नोंदणी पात्रतेचे निकष पुढील प्रमाणे असतील.

१) शिक्षण :- १० वी उत्तीर्ण
२) वय :- २० ते ५० वर्षे
३) उंची :- (पुरुषांसाठी १६२ सें.मि. व महिलांसाठी १५० सें.मि.)
४) छाती :- फक्त पुरुषांसाठी न फुगवता ७६ सेंमि व फुगवून ८१ सें.मि.

वर नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणा-यां उमेदवारांस विहीत केलेल्या वेळेत धावणे व गोळाफेक हया शारीरीक चाचण्या दयाव्या लागतील

निवड होवून पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तर त्यांना वेतनी सेवेत असल्यास कार्यालयाचे अथवा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र, पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल व सक्षम वैद्यकिय अधिका-यांचे शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक व इतर अन्य तपशीलाच्या पुष्ठयर्थ सर्व संबधीत प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारास नोंदणीचे वेळी त्यांना स्वखर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीचे वेळी कोणतीही अपघाती घटना घडल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. उमेदवारांची निवड पुर्णपणे गुणवत्तेवर करण्यात येईल.

वर नमुद संपुर्ण माहिती www.dhulepolice.gov.in व जिल्हाधिकारी धुळे यांच्या www.dhule.nic.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

( विवेक पानसरे )
जिल्हा समादेशक होमगार्ड तथा
अपर पोलीस अधीक्षक धुळे

प्रति,
संपादक,---------------
२/- कृपया उपरोक्त बातमी जनहितार्थ आपल्या वृत्तपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देणेस विनंती आहे.